RNI No. MAHBIL/2012/44835
www.dgps.maharashtra.gov.in

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# भाग एक – नाशिक विभागीय पुरवणी

वर्ष - १४, अंक - ८ ] गुरुवार ते बुधवार, फेब्रुवारी २० - २६, २०२५ / फाल्गुन १ - ७, शके १९४६ [ पृष्ठे १०१

## प्राधिकृत प्रकाशन

## शासकीय / संकीर्ण अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी

### नगर विकास विभाग

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक ६ जानेवारी २०२५

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६*

**आदेश**

क्रमांक टीपीएस-३५२४/१९३६/प्र.क्र. ०३/२०२५/नवि-९.— ज्याअर्थी, जळगाव शहर महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीची विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७) (यात यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधिले आहे) चे कलम ३१ चे उप-कलम *(१)* अन्वये शासनाच्या नगर विकास विभागाने अधिसूचना क्रमांक टीपीएस-३५९९/७३८/प्र.क्र.१४२ (अ)/नवि-९, दिनांक ११ फेब्रुवारी २००२ अन्वये मंजूर केली असून ती दिनांक ७ एप्रिल २००२ पासून अंमलात आली आहे (यात यापुढे "उक्त विकास योजना" असे संबोधिले आहे) व सारभूत स्वरूपांच्या वगळलेल्या भागाची पुनर्प्रसिद्ध विकास योजना शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्रमांक टीपीएस-३५०३/४९३/प्र.क्र.१०२ (अ)/०३/नवि-९, दिनांक १० ऑगस्ट २००४ अन्वये मंजूर झाली असून दिनांक १ ऑक्टोबर २००४ पासून अंमलात आलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये, सोबतच्या परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मौजे जळगाव येथील सर्व्हे क्रमांक ३४५/६+७+१०/१ (भाग) मधील जागा (यात यापुढे "उक्त आरक्षित जागा" असे संबोधिले आहे) "वाघुर कॅनॉल" (यात यापुढे "उक्त आरक्षण" असे संबोधिले आहे) व १२.०० मीटर रुंद विकास योजना रस्ता (यात यापुढे "उक्त विकास योजना रस्ता" असे संबोधिले आहे) याकरिता आरक्षित आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणाकरिता समुचित प्राधिकरण वाघुर धरण विभाग असून उक्त विकास योजना रस्त्याकरिता समुचित प्राधिकरण जळगाव महानगरपालिका (यात यापुढे एकत्रितपणे "उक्त समुचित प्राधिकरणे" असे संबोधिले आहे) आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त समुचित प्राधिकरणांनी उक्त आरक्षित जागा, उक्त विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून दहा वर्षांच्या कालावधीमध्ये संपादन केल्या नाहीत ;

आणि ज्याअर्थी, मौजे जळगाव येथील सर्व्हे क्रमांक ३४५/६+७+१०/१ (भाग) मधील ३४६० चौरस मीटर जागेच्या (यात यापुढे "उक्त जागा" असे संबोधिले आहे) मालकाने उक्त अधिनियमाचे कलम १२७ चे उप-कलम *(१)* नुसार, उक्त समुचित प्राधिकरणांवर

दिनांक २२ ऑगस्ट २०२२ रोजीची सूचना (यात यापुढे "उक्त सूचना" असे संबोधिले आहे) बजावून उक्त जागा, उक्त प्राधिकरणांनी विहित कालावधीत संपादन केली नसल्याचे कळविले होते ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजना व उक्त जागेच्या मोजणी नकाशावरून, उक्त सूचनेंतर्गत, मौजे जळगाव येथील सर्व्हे क्रमांक ३४५/६+७+१०/१ (भाग) मधील ३४६० चौरस मीटर जागेपैकी केवळ ३१३२ चौरस मीटर जागा उक्त आरक्षण व उक्त विकास योजना रस्त्याने बाधित होत आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त सूचना बजावल्यानंतरही उक्त समुचित प्राधिकरणांनी, विहित कालावधीत उक्त जागा संपादन केली नाही अथवा त्या संपादन करण्यासंबंधीची उक्त अधिनियमाचे कलम १२६ *(४)* सहभूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ अन्वयेची भूसंपादनाची अधिसूचना विहित कालावधीत प्रसिद्ध केली नाही ;

आणि ज्याअर्थी, उक्त जागेच्या मालकांनी मा. मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर येथे रिट याचिका क्रमांक ७९८/२०२३ दाखल केली असून सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दिनांक ८ मार्च २०२४ रोजी अंतिम निर्णय पारित केलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त सूचना बजावल्यापासून, उक्त समुचित प्राधिकरणांनी विहित कालावधीत उक्त जागा संपादन केली नाही अथवा उक्त जागा संपादन करण्यासंबंधीची, उक्त अधिनियमाचे कलम १२६ *(४)* सह भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ अन्वये भूसंपादनाची अधिसूचना विहित कालावधीत प्रसिद्ध केलेली नाही. त्यामुळे या परिस्थितीत उक्त अधिनियमाचे कलम १२७ *(१)* मधील तरतुदींनुसार उक्त जागेवरील उक्त आरक्षण / उक्त विकास योजना रस्ता व्यपगत झाले असल्याचे शासनाचे मत झाले आहे.

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम १२७ *(२)* नुसार प्राप्त अधिकारात राज्य शासन, जळगाव शहर महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीच्या विकास योजनेतील मौजे जळगाव, तालुका जळगाव मधील सर्व्हे क्रमांक ३४५/६+७+१०/१ (भाग) मधील परिशिष्टात नमूद केल्यानुसार ३४६० चौरस मीटर जागेपैकी ३१३२ चौरस मीटर क्षेत्रावरील "वाघुर कॅनॉल" व १२.०० मीटर रुंद विकास योजना रस्ता व्यपगत झाल्याचे अधिसूचित करीत आहे व अशाप्रकारे आरक्षणातून मुक्त झालेली जमीन संबंधित जमीनमालकास, उक्त विकास योजनेतील लगतच्या अनुज्ञेय भूवापराप्रमाणे अन्यथा अनुज्ञेय असलेल्या विकासाकरिता उपलब्ध होईल ;

**परिशिष्ट**

| गावाचे नाव, तालुका व जिल्हा | जमिनीचा सर्व्हे क्रमांक/ हिस्सा क्रमांक | उक्त अधिनियमाचे कलम १२७ *(२)* अन्वये व्यपगत होणारे क्षेत्र | मंजूर विकास योजनेतील प्रस्ताव |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| मौजे जळगाव, तालुका जळगाव, जिल्हा जळगाव. | सर्व्हे क्रमांक ३४५/६+७+१०/१ (भाग). | एकूण क्षेत्र ३४६० चौ. मी. पैकी व्यपगत होणारे क्षेत्र ३१३२ चौ. मी. | "वाघुर कॅनॉल" (भागशः) व १२.०० मीटर रुंद विकास योजना रस्ता (भागशः). |

प्रस्तुत आदेशान्वये उक्त आरक्षण / उक्त विकास योजना रस्त्यामधून व्यपगत झालेले क्षेत्र दर्शविणाऱ्या भाग नकाशाची प्रत आयुक्त, जळगाव महानगरपालिका, जळगाव व कार्यकारी अभियंता, वाघुर कालवा विभाग, जळगाव यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्याच्या कालावधीसाठी ठेवण्यात आली आहे.

सदरचा आदेश महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** (कायदे / नियम) या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

*महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,*

**धैर्यशील ह. पाटील,**
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Mumbai - 400 032.

dated 6th February 2025

*The Maharashtra Regional Planning and Town Planning Act, 1966*

### Order

No. TPS-3524/1936/C.R. 03/2025/UD-9.– Whereas, the Development Plan of the Extended Area of the Jalgaon City Municipal Corporation has been sanctioned by the Government under the provisions of Section 31 *(1)* of the Maharashtra Regional Planning and Town Planning Act, 1966 (Mah. Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") *vide* Notification No. TPS-3599/738/CR-142 (A)/UD-9, dated 11th February 2002 and has come into force with effect from dated the 7th April 2002 (hereinafter referred to as "the said Development Plan") and the Republished Development Plan of the excluded part of substantial nature modifications has been sanctioned *vide* Notification No. TPS-3503/493/CR-102(A)/03/UD-9, dated 10th August 2004 and has come into force with effect from dated the 1st October 2004 ;

and whereas, in the said Development Plan the land bearing Survey No. 345/6+7+10/1 (Part) of Mauje Jalgaon (hereinafter referred to as "the said Reserved Land") is reserved as "Waghur Canal" (Part) and 12.00 mtrs. wide Development Plan Road (Part) (hereinafter referred to as "the said Development Plan Road") ;

and whereas, the Waghur Dam Department is Appropriate Authority for the said Reservation and the Jalgaon City Municipal Corporation is Appropriate Authority for the said Development Plan Road (hereinafter collectively referred to as "the said Appropriate Authorities") ;

and whereas, the said Reserved Land has not been acquired by the said Appropriate Authorities, within ten years from the date on which the said Development Plan came into force ;

and whereas, the Owner of the land admeasuring 3460 sq. mtrs. bearing Survey No. 345/6+7+10/1 (Part) of Mauje Jalgoan (hereinafter referred to as "the said Land") out of the said Reserved Land, in reference to the said Reservation, had served a notice dated 22nd August 2022 under Section 127 *(1)* of the said Act to the said Appropriate Authorities, being the Planning Authority (hereinafter referred to as "the said Notice") ;

and whereas, out of the total area of 3460 sq. mtrs. under the said Notice, only 3132 sq. mtrs. area is affected by the said Reservation and the said Development Plan Road as per the said Development Plan and the measurement sheet of the said Land ;

and whereas, even after service of the said Notice as aforesaid, the said Land had neither been acquired within prescribed time period, nor the Notification of land acquisition required under Section 126 *(4)* of the said Act, read with Section 19 of the Right to Fair Compensation of Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013 has been published by the said Appropriate Authorities within prescribed time period from the date of the service of said Notices under sub-section *(1)* of Section 127 of the said Act ;

and whereas, the owner of the said Land has filed Writ Petition No. 798/2023 before the Hon'ble Bombay High Court, Aurangabad Bench, Chhatrapati Sambhajinagar and the final order is passed on dated the 8th March 2024 by the Hon'ble High Court ;

and whereas, it is observed that, the said Land had neither been acquired within prescribed time period from the date of service of Notices, nor Notification of land acquisition required under Section 126 *(4)* of the said Act, read with Section 19 of the Right to Fair Compensation of Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013 been published within prescribed time period by the said Appropriate Authority. And, in consequence thereof, the Government of Maharashtra is of opinion that, the said Reservation / the said Development Plan Road, on the said Land stands lapsed as per the provisions of Section 127 *(1)* of the said Act ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section *(2)* of Section 127 of the said Act and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra, as mentioned in the Annexure below, hereby notifies that, the said Reservation *i.e.* "Waghur Canal" and the said Development Plan Road as specified in the sanctioned Development Plan of the Extended Area of Jalgaon City Municipal Corporation, stands lapsed to the extent of area admeasuring 3132 sq. mtrs. out of the total area admeasuring 3460 sq. mtrs. bearing Survey No. 345/6+7+10/1 of Mauje Jalgaon and the area so released will be available to the owners for the purpose of development as otherwise permissible in the case of adjacent land under the said Development Plan.

**Annexure**

| Name of the village, taluka and district | Survey No./ Hissa No. | Area lapsed under Section 127 *(2)* of the said Act | Reservation of sanctioned Development Plan |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| Mauje Jalgaon, taluka and district Jalgaon. | Survey No. 345/6+7+10/1 (Part). | Are admeasuring 3132 sq.mtrs. out of total area 3460 sq. mtrs. | "Waghur Canal" (Part) and 12.00 mtrs. wide Development Plan Road (Part). |

A copy of the Part Plan, showing the area of the said Reservation / the said Development Plan Road, which has been lapsed vide this Order is available in the offices of the Commissioner, Jalgaon City Municipal Corporation, Dist. Jalgaon and the Executive Engineer, Waghur Canal Department, Jalgaon, during office hours on all working days for inspection of public for the period of one month.

This Order shall also be published on the Government website **www.maharashtra.gov.in** (Acts/ Rules).

*By Order and in the name of the Governor of Maharashtra,*

**DHAIRYASHIL H. PATIL,**

Section Officer to Government.

## मुख्याधिकारी यांजकडून

### जामखेड नगरपरिषद, जामखेड

क्रमांक नपजा/टे.नं.०४/१७१/२०२५. --- ज्याअर्थी, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ व त्यात वेळोवेळी झालेल्या सुधारणेनुसार प्राप्त अधिकारान्वये, मुख्याधिकारी, नगरपरिषद जामखेड याद्वारे उक्त अध्यादेशाच्या व अधिनियमाच्या प्रयोजनार्थ महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ अन्वये जामखेड नगरपरिषदेकडून नागरिकांना पुरविण्यात येत असलेल्या महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम अंतर्गत विविध लोकसेवा, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम आणि द्वितीय अपिलीय प्राधिकारी या बाबी खालील परिशिष्टामध्ये नमूद केल्याप्रमाणे अधिसूचित करीत आहे.

**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या कलम ३ अन्वये**

**जामखेड नगरपरिषद, जामखेड, जिल्हा अहिल्यानगर यांनी जाहीर करावयाचा लोकसेवेचा तपशील**

| अ. क्र. | सेवा | आवश्यक कागदपत्रे | शुल्क | कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | द्वितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जन्म प्रमाणपत्र देणे | विहित नमुन्यातील अर्ज | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | लिपिक, जन्म मृत्यू | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| २ | मृत्यू प्रमाणपत्र देणे | विहित नमुन्यातील अर्ज | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | लिपिक, जन्म मृत्यू | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ३ | विवाह नोंदणी प्रमाणपत्र देणे | विहित नमुन्यातील अर्ज | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | लिपिक, जन्म मृत्यू | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ४ | मालमत्ता कर उतारा देणे | विहित नमुन्यातील अर्ज | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ५ | थकबाकी नसल्याचा दाखला देणे | विहित नमुन्यातील अर्ज | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ६ | दस्तऐवजाच्या आधारे मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला<br>३. दस्तऐवजाची प्रत (खरेदी खत / बक्षीस पत्र / वाटणीपत्र व इतर) | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| | वारसा हक्काने मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला<br>३. वारस हक्क प्रमाणपत्र | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ७ | झोन दाखला देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. ७/१२ उतारा / सिटी सर्व्हे उतारा<br>३. मोजणी नकाशा / सिटी सर्व्हे नकाशा | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | ७ दिवस | रचना सहायक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | भाग नकाशा देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. ७/१२ उतारा / सिटी सर्व्हे उतारा<br>३. मोजणी नकाशा / सिटी सर्व्हे नकाशा | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | रचना सहायक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ९ | बांधकाम परवाना देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. वास्तुविशारदाचा दाखला<br>३. मालकी हक्काची कागदपत्रे<br>४. बांधकाम आरखडा नकाशा ५ प्रती<br>५. मोजणी नकाशा<br>६. मंजूर रेखांकनांची प्रत | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | ६० दिवस | रचना सहायक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| १० | जोते प्रमाणपत्र देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | रचना सहायक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ११ | भोगवटा प्रमाणपत्र देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र<br>३. जोते प्रमाणपत्र<br>४. घर मालक / वास्तू विशारद यांचे पूर्णत्वाचे स्वयं घोषणापत्र | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | ३० दिवस | रचना सहायक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| १२ | नळ जोडणी देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. जागा मालकी कागदपत्रे<br>३. थकबाकी नसल्याचा दाखला | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | पाणीपुरवठा व स्वच्छता अभियंता | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| १३ | जलनिस्सारण जोडणी देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. जागा मालकी कागदपत्रे<br>३. थकबाकी नसल्याचा दाखला | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | पाणीपुरवठा व स्वच्छता अभियंता | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| १४ | नव्याने कर आकारणी करणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. भोगवटा प्रमाणपत्र | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| १५ | पुन: कर आकारणी करणे | विहित नमुन्यातील अर्ज | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| १६ | कराचे मागणीपत्र तयार करणे | विहित नमुन्यातील अर्ज | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १७ | कर माफी मिळणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | ७ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| १८ | रहिवास नसलेल्या मालमत्तांना करात सुट मिळणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| १९ | स्वयंमुल्यांकन | विहित नमुन्यातील अर्ज | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| २० | आक्षेप नोंदविणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| २१ | उप विभागामध्ये मालमत्ता विभाजन | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला<br>३. मालकी हक्काची कागदपत्रे (खरेदीखत / वाटणी पत्र / बक्षिसपत्र ) | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| २२ | मालमत्ता पाडणे व पुनर्बांधणी कर आकारणी करणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| २३ | मालकी हक्कात बदल करणे - नळ कनेक्शन | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला<br>३. मालकी हक्क कागदपत्रे | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | ७ दिवस | पाणीपुरवठा व स्वच्छता अभियंता | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| २४ | नळ जोडणी आकारात बदल करणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | पाणीपुरवठा व स्वच्छता अभियंता | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| २५ | तात्पुरते / कायमस्वरूपी नळ जोडणी खंडित करणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | ७ दिवस | पाणीपुरवठा व स्वच्छता अभियंता | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| २६ | पुन: जोडणी करणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | पाणीपुरवठा व स्वच्छता अभियंता | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| २७ | वापरामध्ये बदल करणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | पाणीपुरवठा व स्वच्छता अभियंता | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| २८ | पाणी देयक तयार करणे | विहित नमुन्यातील अर्ज | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | पाणीपुरवठा अभियंता | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २९ | प्लंबर परवाना देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला<br>३. शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | पाणीपुरवठा व स्वच्छता अभियंता | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ३० | प्लंबर परवाना नुतनीकरण करणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला<br>३. शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | पाणीपुरवठा व स्वच्छता अभियंता | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ३१ | थकबाकी नसल्याचा दाखला देणे | विहित नमुन्यातील अर्ज | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | पाणीपुरवठा अभियंता | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ३२ | अनधिकृत नळ जोडणी तक्रार करणे | विहित नमुन्यातील अर्ज | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | ७ दिवस | पाणीपुरवठा व स्वच्छता अभियंता | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ३३ | पाण्याची दबाव क्षमता तक्रार | विहित नमुन्यातील अर्ज | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | पाणीपुरवठा व स्वच्छता अभियंता | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ३४ | पाण्याची गुणवत्ता तक्रार | विहित नमुन्यातील अर्ज | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | पाणीपुरवठा व स्वच्छता अभियंता | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ३५ | व्यापार / व्यवसाय करणेसाठी ना-हरकत प्रमाणपत्र देणे | विहित नमुन्यातील अर्ज | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | ७ दिवस | लिपिक, दाखला / उतारा/ ना-हरकत विभाग | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ३६ | मंडपासाठी ना-हरकत प्रमाणपत्र देणे | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. रस्ता पुनर्स्थापन करार | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | ७ दिवस | लिपिक, दाखला / उतारा/ ना-हरकत विभाग | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ३७ | नवीन परवाना मिळणे | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | लिपिक, दाखला / उतारा/ ना-हरकत विभाग | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ३८ | परवान्याचे नुतनीकरण | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | लिपिक, दाखला / उतारा/ ना-हरकत विभाग | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३९ | परवाना हस्तांतरण | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज २. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | लिपिक, दाखला / उतारा/ ना-हरकत विभाग | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ४० | परवाना दुय्यम प्रत देणे | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज २. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | लिपिक, दाखला / उतारा/ ना-हरकत विभाग | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ४१ | व्यवसायाचे नाव बदलणे | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज २. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | लिपिक, दाखला / उतारा/ ना-हरकत विभाग | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ४२ | व्यवसाय बदलणे | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज २. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | लिपिक, दाखला / उतारा/ ना-हरकत विभाग | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ४३ | परवाना / भागीदाराचे नाव बदलणे | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज २. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | लिपिक, दाखला / उतारा/ ना-हरकत विभाग | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ४४ | भागीदारांच्या संख्येत बदल करणे | योग्य प्रकारे भरलेले अर्ज | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | लिपिक, दाखला / उतारा/ ना-हरकत विभाग | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ४५ | परवाना रद्द करणे | योग्य प्रकारे भरलेले अर्ज | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | लिपिक, दाखला / उतारा/ ना हरकत विभाग | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ४६ | कालबाह्य परवान्यासाठी नुतनीकरण सूचना | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज २. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | लिपिक, दाखला / उतारा/ ना-हरकत विभाग | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ४७ | जाहिरात परवाना / आकाश चिन्ह परवाना ( नवीन परवाना व नुतनीकरण) | १. विहित नमुन्यातील अर्ज २. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | नगर अभियंता, स्थापत्य | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ४८ | सिनेमा चित्रीकरण परवाना, नवीन परवाना व नुतनीकरण | १. विहित नमुन्यातील अर्ज २. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | लिपिक, दाखला / उतारा/ ना-हरकत विभाग | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४९ | व्यवसाय परवाना स्वयं नुतनीकरण | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | लिपिक, दाखला / उतारा / ना-हरकत विभाग | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ५० | मोबाईल टॉवर परवाना | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. माहिती तंत्रज्ञान विभाग यांनी दिलेला परवाना<br>३. संबंधित इमारतीच्या मालकी हक्काचा पुरावा<br>४. वैध भाडे करारनामा<br>५. स्थळाचा नकाशा (१:१०००)<br>६. ज्या इमारतीवर टॉवर उभारावयाचा आहे त्याचे वैध भोगवटा प्रमाणपत्र<br>७. संबंधित इमारतीच्या / जमिनीच्या मालकाचे हमीपत्र<br>८. सक्षम प्राधिकाऱ्याचा अग्निशमन ना-हरकत दाखला<br>९. सक्षम प्राधिकाऱ्याचे संरचनात्मक स्थिरता प्रमाणपत्र<br>१०. पर्यावरण विभागाची ना-हरकत<br>११. संबंधित नगरी संस्थेचे न देय प्रमाणपत्र<br>१२. शासन वेळोवेळी निश्चित करेल असे इतर आवश्यक परवाने / दस्तऐवज | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | ६० दिवस | नगर अभियंता - स्थापत्य | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ५१ | रस्ता खोदाई परवाना देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. न.प. ची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र.<br>३. शासन वेळोवेळी निश्चित करेल असे इतर आवश्यक परवाने / दस्तऐवज | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | ३० दिवस | नगर अभियंता, स्थापत्य | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५२ | राज्य खाद्य परवान्या-करिता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा ना-हरकत दाखला | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. न.प. ची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र.<br>३. ज्या इमारतीत सदर आस्थापना / कारखाना होणार आहे त्या इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र आणि सदरच्या मालकी हक्काबाबतची कागदपत्रे<br>४. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे. | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | ३० दिवस | लिपिक, दाखला / उतारा / ना-हरकत विभाग | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ५३ | खाद्य नोंदणी प्रमाणपत्राकरिता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा आरोग्य विषयक ना-हरकत दाखला | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. न.प. ची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र.<br>३. ज्या इमारतीत सदर आस्थापना / कारखाना होणार आहे त्या इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र आणि सदरच्या मालकी हक्काबाबतची कागदपत्रे<br>४. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे. | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | ३० दिवस | लिपिक, दाखला / उतारा / ना-हरकत विभाग | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ५४ | पाणी अनुपलब्धता प्रमाणपत्र देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. न.प. ची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र.<br>३. ना-हरकत प्रमाणपत्र दिल्यानंतर भोगवटा प्रमाणपत्र घेणेबाबतचे व पर्जन्य जल पुनर्भरण करणे बाबतचे प्रतिज्ञापत्र<br>४. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे. | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | ३० दिवस | पाणीपुरवठा व स्वच्छता अभियंता | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ५५ | लॉजिंग हाऊस परवाना देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. शासन वेळोवेळी विहित करील अशी आवश्यक कागदपत्रे | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | ३० दिवस | मुख्याधिकारी | जिल्हा सहआयुक्त | विभागीय सहआयुक्त |
| ५६ | लॉजिंग हाऊस परवान्याचे नूतनीकरण करणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. शासन वेळोवेळी विहित करील अशी आवश्यक कागदपत्रे | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | ३० दिवस | मुख्याधिकारी | जिल्हा सहआयुक्त | विभागीय सहआयुक्त |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५७ | मंगल कार्यालय सभागृह परवाना देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. शासन वेळोवेळी विहित करील अशी आवश्यक कागदपत्रे | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | ३० दिवस | मुख्याधिकारी | जिल्हा सहआयुक्त | विभागीय सहआयुक्त |
| ५८ | मंगल कार्यालय सभागृह वगैरे परवान्याचे नूतनीकरण करणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. शासन वेळोवेळी विहित करील अशी आवश्यक कागदपत्रे | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | ३० दिवस | मुख्याधिकारी | जिल्हा सहआयुक्त | विभागीय सहआयुक्त |
| ५९ | फेरीवाले नोंदणी प्रमाणपत्र देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. शासन वेळोवेळी विहित करील अशी आवश्यक कागदपत्रे | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | मुख्याधिकारी | जिल्हा सहआयुक्त | विभागीय सहआयुक्त |
| ६० | भूमीगत दूरसंचार वाहिनी टाकण्याकरिता परवानगी देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. शासन वेळोवेळी विहित करील अशी आवश्यक कागदपत्रे<br>३. न.वि.वि. शासन नि.क्र. संकीर्ण २०२१ /C.R. 242 / UD 20, दि. १९/१२/२२ मधील Schedule III नुसार आवश्यक कागदपत्रे | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | ६० दिवस | मुख्याधिकारी | जिल्हा सहआयुक्त | विभागीय सहआयुक्त |
| ६१ | महाराष्ट्र नागरिक क्षेत्र वृक्ष संरक्षण आणि संवर्धन अधिनियम, १९७५ मधील कलम ८ मधील तरतुदीनुसार वृक्षतोड परवानगी देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. शासन वेळोवेळी विहित करील अशी आवश्यक कागदपत्रे | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | ४५ दिवस | लिपिक, उद्यान विभाग | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ६२ | रस्त्यांवरील खड्डे बुजविणे | पुराव्यासह अर्ज उदा. जिओ टॅग केलेले अर्ज | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | ५ दिवस | नगर अभियंता, स्थापत्य | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ६३ | गटारांवरील झाकणे सुस्थितीत ठेवणे | पुराव्यासह अर्ज उदा. जिओ टॅग केलेले अर्ज | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | ५ दिवस | नगर अभियंता, स्थापत्य | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ६४ | शहरात स्वच्छता ठेवणे | पुराव्यासह अर्ज उदा. जिओ टॅग केलेले अर्ज | न.प. स्तरावर निश्चित केलेले दर | १ दिवस | पाणीपुरवठा व स्वच्छता अभियंता | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |

**अजय साळवे,**

मुख्याधिकारी,

जामखेड नगरपरिषद, जामखेड,

जिल्हा अहिल्यानगर.

जामखेड, १२ फेब्रुवारी २०२५.